पोलीस अधीक्षक, कार्यालय, पालघर.
जिल्हा मुख्यालय, कोळगाव, पालघर
दुरध्वनी – ०२५२५ - २५११००
E-mail: - sp. palghar@mahapolice.gmail.com

---

# प्रेसनोट क्र. १६ दिनांक १०/०३/२०२३

# स्थानिक गुन्हे शाखा, पालघरकडून दरोडयाच्या गुन्ह्याची उकल करुन तीन आरोपींना जेरबंद.

दिनांक ०३.०३.२०२३ रोजी दुपारी ०३.०० वा. च्या सुमारास यातील फिर्यादी श्री अक्षय सदानंद पावडे वय २७ वर्ष, व साक्षीदार सौ.पल्लवी उदय संखे असे श्री राजेश्री ट्रान्सपोर्ट बोईसर या ट्रान्सपोर्ट ऑफिसमध्ये काम करीत असतांना यातील अज्ञात आरोपी यांनी आपसात संगणमत करुन सदर ट्रान्सपोर्ट ऑफिसमध्ये येवुन फिर्यादी व साक्षीदार हिस चाकुचा धाक दाखवुन, मारण्याची धमकी देवुन त्यांचे हात सुतळीने बांधुन एका आरोपीने फिर्यादीचे गळ्यातील सोन्याची चैन,दुस-या आरोपीने साक्षीदार हिचे गळ्यातील सोन्याचे मंगळसुत्र तसेच चहा घेवुन आलेला दुकानदार देवीलाल पाटीदार याचे हातातील पुष्कराज खड्याची सोन्याची अंगठी असा एकुण ५२,०००/-रुपये किमतीचा माल जबरी चोरी करुन चोरुन नेला म्हणुन बोईसर पोलीस ठाणे येथे I ९२/२०२३ भादविस कलम ३९२,३४७,३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयांचे गांभीर्य लक्षात घेवुन श्री.बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक पालघर, श्री. पंकज शिरसाट, अपर पोलीस अधीक्षक, पालघर यांच्या आदेशान्वये श्री. नित्यानंद झा, सहायक पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, बोईसर याच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा, पालघर व बोईसर पोलीस ठाणे येथील अधिकारी व अंमलदार यांची वेगवेगळी पथके तयार करुन तपासाबाबत सुचना देण्यात आल्या. सदर पथकापैकी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने तांत्रीक पुराव्यांच्या आधारे कोणतेही धागेदोरे नसतांना सखोल व कौशल्यपुर्ण तपास करुन ०३ संशयीत इसम १) वय- ५४ वर्षे, रा. जोशीबाग, कल्याण जि.ठाणे मुळ रा. मालपा डोंगरी, एम.आय.डी.सी. अंधेरी पुर्व,मुंबई २) वय-३९ वर्षे रा. जोशीबाग, कल्याण जि.ठाणे मुळ रा. झांशी राज्य मध्यप्रदेश ३) वय-४२ वर्षे रा. बकरेवाली चाळ, नित्यानंद नगर, घाटकोपर, मुंबई यांना ताब्यात घेवुन त्यांच्याकडे सखोल चौकशी केली असता त्यांनी सदर गुन्हा केल्याचे कबुल केले आहे. नमुद गुन्ह्यात ०३ आरोपीस अटक करुन भादविसं कलम ३९५, ३९८ अधिकची कलमे समाविष्ट करण्यात आली आहेत. गुन्ह्याचा अधिक तपास हा सपोनि श्री गजानन पडळकर, बोईसर पोलीस ठाणे हे करीत आहेत.

सदरची कामगिरी श्री.बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक, पालघर, श्री. पंकज शिरसाट, अपर पोलीस अधीक्षक पालघर यांचे आदेशान्वये श्री नित्यानंद झा, सहा.पोलीस अधीक्षक, तथा उप विभागीय पोलीस अधिकारी बोईसर विभाग, यांच्या मार्गदर्शनाखाली श्री प्रदिप कसबे, पोलीस निरीक्षक बोईसर पोलीस ठाणे, श्री अनिल विभुते, पोलीस निरीक्षक स्थागुशा,पालघर,सपोनि/ गजानन पडळकर, पोउपनि/ गणपत सुळे, पोउपनि/ स्वप्निल सावंतदेसाई, नेम- स्थागुशा, पालघर, पोउपनि/शरद सुरळकर, पोउपनि/विठ्ठल मणिकेरी तसेच बोईसर पोलीस ठाणे व स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलीस अंमलदार यांनी यशस्वीरित्या पार पाडली.